# प्रकरण पाचवे

# बंदिजणांच्या सुधारणा व पुनर्वसनासाठी कळंबा मध्यवर्ती कारागृहात राबविले जाणारे व्यावसायिक उपक्रम

## प्रकरण ५ वे

# बंदिजणांच्या सुधारणा व पुनर्वसनासाठी कळंबा मध्यवर्ती कारागृहात राबविले जाणारे व्यावसायिक उपक्रम

**प्रस्ताविक -**

बंदिजणांच्या श्रमशक्तीचा सकारात्मक वापर व्हावा, गजाआड राहिल्याने त्यांच्यात येणारे नैराश्य दूर होऊन ते सुजाण नागरिक म्हणून समाजात समरस व्हावेत. त्यांच्यात सुधारणा करून त्यांचे पूनर्वसन होण्याच्या दृष्टीकोनातुन कळंबा मध्यवर्ती कारागृहात विविध उपक्रम राबविले जातात. त्यामध्ये शैक्षणिक, सामाजिक व व्यावसायिक उपक्रमांचा समावेश होतो. कारागृहातून पुन्हा समाजात आल्यानंतर बंदिजणांना उत्पादणाचे साधन मिळून त्यांना आपल्या पायावर सक्षमपणे उभे करण्यासाठी या उपक्रमांची मदत होते.

या प्रकरणात व्यावसायिक उपक्रमांची माहिती घेतली आहे. या व्यावसायिक उपक्रमांमध्ये प्रशिक्षण दिले जाणारे विविध व्यावसायिक उपक्रम, त्यातून मिळणारे उत्पादन व बंदिजणांनी तयार केलेले विविध वस्तुंचे उत्पादन खरेदी करणाऱ्या विविध शासकीय, अशासक़ीय, व सेवाभावी संस्था यांची माहिती तसेच या कारागृहातील या व्यावसायिक उपक्रमांच्या माध्यमातून बंदिजण विविध वस्तुंचे उत्पादन करतात. व या विविध वस्तुंची खरेदी समाजातील नागरिकांना करता यावी यासाठी कारागृहाच्या परिसरात विक्री केंद्र सुध्दा आहे. या विक्री केंद्राची सुरूवात व या विक्री केंद्रात विक्रिसाठी ठेवण्यात येणारे विविध वस्तु यांची सविस्तर माहिती या प्रकरणात घेतली आहे. म्हणजे या कारागृहात बंदिजणांसाठी राबविले जाणारे हे व्यावसायिक उपक्रम, बंदिजणांसाठी जसे उपयुक्त आहेत तसेच ते समाज उपयोगी सुध्दा आहेत. बंदिजणांनी तयार केलेल्या विविध वस्तुंचे उत्पादनाची समाजातील नागरिक मोठ्या प्रमाणात खरेदी करून एक प्रकारे बंदिजणांच्या

कलागुणांना वाव देत असतात. या सर्व व्यावसायिक उपक्रमांचे कामकाज कारागृहातील कारखाना विभागामार्फत चालते.

तसेच या व्यावसायिक उपक्रमात समाविष्ठ शेती व्यवसाय, बंदिजणांनी पिकवलेल्या शेतीतून कारागृहाला मिळणारे वार्षिक उत्पादन, शेतीमध्ये घेतली जाणारी विविध पिके यांची सविस्तर माहिती या प्रकरणात दिली आहे.

कळंबा मध्यवर्ती कारागृहात बंदिजणांना या व्यावसायिक उपक्रमांचे प्रशिक्षण देऊन त्यांच्याकडून विविध वस्तु तयार करून घेण्याच्या उपक्रमास सन १९९०-९१ पासून सुरूवात झाली. या उपक्रमाद्वारे बंदिजण विविध व्यावसायिक उपक्रमांचे प्रशिक्ष्ण घेऊन प्रशिक्षित होतात. व त्यांना तुरूंगातून बाहेर पडल्यानंतर स्वत:च्या पायावर सक्षमपणे उभे राहण्यासाठी या उपक्रमांची मदत होते.

## कारागृहातील कारखाना विभाग -

राज्यातील विविध ३८ कारागृहांमये शिक्षा भोगणारे व कच्चे असे सुमारे २२ हजारांहून अधिक कैदी बंदिस्त आहेत. या कैद्यांचे मनुष्यबळ वापरून त्यांना आर्थिक लाभ व्हावा तसेच कारागृहातून सूटल्यानंतर सन्मानाने उदर निर्वाहाचे साधन मिळावे यासाठी त्यांना काही कोर्सेस प्रशिक्षण देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. तथापि कोल्हापूर जिल्ह्यातील कळंबा कारागृहात हा प्रयोग गेल्या अनेक वर्षापासून सुरू आहे. कारागृहात टेक्सटाईल, विणकाम, जरीकाम हे विभाग तसेच लोहारकाम, सुतार काम आणि कृषि विभाग पूर्वीपासून प्रसिध्द आहेत.[१]

या व्यावसायिक उपक्रमाचे सर्व कार्यालयीन कामकाज त्यामध्ये कच्च्या मालाची खेरदी व पक्क्या मालाची विक्री व या उत्पादणाचे तपशिल ठेवण्याचे कामकाज कारागृहातील कारखाना विभागाच्या कार्यालयामार्फत चालते. तसेच या विविध व्यावसायिक

उपक्रमातुन बंदिजणांच्या माध्यमातुन ज्या विविध वस्तु तयार केल्या जातात त्यासाठी कारागृहात स्वतंत्र कारखाना विभाग आहे.[२]

या कळंबा मध्यवर्ती कारागृहात कारखाना विभाग सन १९९०-९१ मध्ये सुरू करण्यात आलेला आहे. सध्या या कारागृहामध्ये सुतार काम, शिवणकाम, धोबिकाम, यंत्रमाग/खड्डामाग, लोहारकाम, बेकरी असे एकूण सहा विभाग कार्यरत आहेत.[३] तसेच साड्यांवरती, ड्रेसवरती जरीकाम सुध्दा केले जाते.[४]

या विभागात उत्पादित होणाऱ्या मालाचे गुणवत्ता व उत्पादन वाढविण्यासाठी वेळोवेळी शासन नियुक्त तांत्रिक निर्देशकांमार्फत बंदिजणांना व्यावसायिक प्रशिक्षण दिले जाते. बंदिजणांना दिलेल्या प्रशिक्षणाच्या आधारे बंदिजण भविष्यात कारागृहातुन सुटून गेल्यानंतर त्यांच्या पुनर्वसनासाठी सदर प्रशिक्षणाचा लाभ घेऊ शकतो. फक्त एवढेच नाहीतर त्याच्यामध्ये सुधारणा होऊन त्यास दिलेल्या कारागृहातील प्रशिक्षणाचा फायदा, उपयोग उर्वरित आयुष्यात करू शकतो.[५]

कारागृहातील या कारखाना विभागात सुतारकाम विभाग, शिवणकाम विभाग, धोबीकाम विभाग, यंत्रमाग/खड्डामाग विभाग, लोहारकाम विभाग सन १९९०-९१ पासून सुरू आहेत. परंतु या सर्व विभागांचा उत्पादनाचा तपशिल १९९० पासून २००१ पर्यंत एकत्र उपलब्ध आहे. २००२ पासून या विभागांचा स्वतंत्र उत्पादनाचा तपशिल उपलब्ध आहे. या विभागांचा १९९०-९१ पासूनचा एकत्र उत्पादनाचा तपशिल, व २००२ ते २०१३ पर्यंतचा सर्व विभागाचा स्वतंत्र उत्पादनाचा तपशिल या प्रकरणात देण्यात आला आहे. बेकरी विभाग या कारागृहात २००९ पासून सुरू आहे व जरीकाम २०१० पासून सुरु आहे. त्याचा उत्पादनाचा तपशिल सदर प्रकरणात दिला आहे. या कारखाना विभागात या विविध व्यावसायिक उपक्रमांच्या माध्यमातून तयार होणाऱ्या वस्तुंचे उत्पादन, विभागनिहाय माहिती पुढीलप्रमाणे-

**विभागनिहाय माहिती -**

**१. सुतारकाम विभाग -**

सुतारकाम विभागामध्ये १४ कामाचे टेबल असून तेथे ४३ बंद्यांना काम दिले जाते. सुतारकाम विभागामध्ये लाकडी कपाट, खुर्ची, टेबल, टी-पॉय, न्यूजपेपर स्टॅण्ड, इत्यादी सर्व प्रकारच्या लाकडी फर्निचरचे उत्पादन केले जाते.[६] या कारागृहात सुतारकाम विभाग हा १९९०-९१ पासून सुरू करण्यात आला आहे. परंतु या विभागाचा स्वतंत्र उत्पादणाचा तपशिल हा सन २००२ पासून उपलब्ध आहे. १९९० ते २००१ पर्यंतचा उत्पादनाचा तपशिल हा सन १९९०-९१ मध्ये कारागृहात सुरू केलेल्या सर्व विभागाचा एकत्रित उपलब्ध आहे व तो सोबत सादर करण्यात आला आहे.

२००२ पासून २०१३ पर्यंतचा सुतारकाम विभागाचा स्वतंत्र उत्पादनाचा तपशिल पुढील प्रमाणे

| अ.क्र. | वर्ष | उत्पादन (रूपयात) |
|---|---|---|
| १. | २००२ | ८२८,८००.४१ |
| २. | २००३ | ३५९,२०७.८५ |
| ३. | २००४ | १२२,८३३.७५ |
| ४. | २००५ | २,३०२,९९३.५६ |
| ५. | २००६ | ६१८,६७७.३० |
| ६. | २००७ | ५७१,७०४.७० |

| | | |
|---|---|---|
| ७. | २००८ | ४९६,११३.७५ |
| ८. | २००९ | ३५७,८४४.५० |
| ९. | २०१० | १८७,३९९.०० |
| १०. | २०११ | ८७५,३४६.४५ |
| ११. | २०१२ | १,१०५,०१०.०१ |
| १२. | २०१३ | ९१२,७२५.९० |

[७]

## २. शिवणकाम विभाग -

शिवणकाम विभागामध्ये ४३ शिलाई मशिन, २४ ओव्हरलॉक मशिन, २ काज मशिन आहेत. या विभागात ५६ बद्यांना काम दिले जाते. पोलिस विभाग, होमगार्ड विभाग, तसेच शासकीय, निमशासकीय संस्थेकडून खाकी गणवेश, शालेय विद्यार्थी / विद्यार्थीनींचे गणवेश, हॉस्पिटल गणवेश, बंडी, चोळणा, गाऊन उशी कव्हर इत्यादीचे शिलाई केली जाते.[८]

| अ.क्र. | वर्ष | उत्पादन (रूपयात) |
|---|---|---|
| १. | २००२ | १,५९०,८४५.७९ |
| २. | २००३ | ६६०,५३७.०० |
| ३. | २००४ | २८०,३२८.५० |
| ४. | २००५ | १,५३४,२२१.२६ |
| ५. | २००६ | १,५३३.३७८.१५ |

| | | |
|---|---|---|
| ६. | २००७ | २,२४६,१६५.०० |
| ७. | २००८ | १,६०६,३६९.०० |
| ८. | २००९ | ६३४,४४४.०० |
| ९. | २०१० | ९२०,८४०.०० |
| १०. | २०११ | १,००८,०५८.०० |
| ११. | २०१२ | १,६४०,२४४.३४ |
| १२. | २०१३ | २०,८४,७९२.०४ |

[९]

### ३. धोबीकाम विभाग -

धोबीकाम विभागामध्ये वॉश्गि मशिन, बॉयलर, क्लॉथ ड्रायर मशिन, कार्यान्वित असून १२ बंद्यांना काम दिले जाते. या विभागामध्ये कर्मचारी कपडे धुलाई व ईस्त्री, कार्यालयीन, आकस्मिक विभागाचे कैदी कपडे, बिछायती, पडदे इत्यादीचे धुलाई करुन दिले जाते.[१०]

| अ.क्र. | वर्ष | उत्पादन (रूपयात) |
|---|---|---|
| १. | २००२ | ५३,६१४.५० |
| २. | २००३ | ६३,४६८.५० |
| ३. | २००४ | ३३,२२०.०० |
| ४. | २००५ | ८५,५२८.९५ |

| | | |
|---|---|---|
| ५. | २००६ | १०१,८९२.०० |
| ६. | २००७ | ९१,७३५.०० |
| ७. | २००८ | ९५,९२३.०० |
| ८. | २००९ | ८९,३८५.०० |
| ९. | २०१० | ७२,५३०.०० |
| १०. | २०११ | ६४,००१.५० |
| ११. | २०१२ | ९२,३६७.०० |
| १२. | २०१३ | २०,७९२.०४ |

[११]

**४. यंत्रमाग / खड्डामाग विभाग -**

यंत्रनाग / खड्डामाग विभागामध्ये २६ यंत्रमाग, २० खड्डामाग, १ वार्पिंग मशिन, ११ डॉबी मशिन, १ हॅक टू कोन वायंडिग मशिन कार्यरत आहेत. सदर विभागात कापड व सुतावर रंगकाम केले जाते. या विभागामध्ये सरासरी १२५ बंद्यांना काम दिले जाते. पोलिस विभागाचे पोलिस दरी तसेच सफेद कापड, सफेद ड्रील कापड, मच्छरदाणी कापड, सफेद व रंगीत बेडशिट्स, रंगीत टॉवेल, डायमंड चादर, व्हॅट लूम दरी, गाद्या इत्यादी वस्तुंचे उत्पादने घेतली जातात.[१२] या विभागाचे २००२ ते २०१३ पर्यंतचे वार्षिक उत्पादन पुढील प्रमाणे -

| अ.क्र. | वर्ष | उत्पादन (रूपयात) |
|---|---|---|
| १. | २००२ | ३,८८६,२३६.४४ |
| २. | २००३ | ३,०८५,३०३.७० |
| ३. | २००४ | २,४५१,९५८.२५ |
| ४. | २००५ | ८,०२७,७०८.१५ |
| ५. | २००६ | ५,०९३,०१६.५५ |
| ६. | २००७ | ३,२८८,१७७.५० |
| ७. | २००८ | ३,७५६,३५९.२५ |
| ८. | २००९ | २,२३६,०१८.५० |
| ९. | २०१० | ३,११३,३२१.४२ |
| १०. | २०११ | ५०७,१६७.०० |
| ११. | २०१२ | २,२१२,७२१.७९ |
| १२. | २०१३ | ४८,७७,११६.१२ |

[१३]

## ५. लोहारकाम विभाग -

लोहारकाम विभागामध्ये एअर कॉम्प्रेसर, इलेक्ट्रीक वेल्डींग मशिन, लेथ मशिन, बेंच ग्रांयडर, हॅक्सामशिन इत्यादी मशिनरी कार्यान्वित आहेत. या विभागात सरासरी ५३ बंद्यांना काम देण्यात येते. या विभागाकडे कोल्हापूर परिसरातील जिल्हा परिषदांच्या शैक्षणिक संस्था, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, ग्रामीण रूग्णालय यांचेकडून स्टिल कपाट, एस टाईप

खुर्च्या, ड्युवेल डेस्क, संगणक टेबल, लोखंडी रॅक, स्ट्रेचर, कॅश बॉक्स इत्यादी मागण्या नोंदविण्यात येतात.[१४]

या विभागाचे २०२ ते २०१३ पर्यंतचे वार्षिक उत्पादन तपशिल पुढीलप्रमाणे -

| अ.क्र. | वर्ष | उत्पादन (रूपयात) |
|---|---|---|
| १. | २००२ | ५३१,४८६.४५ |
| २. | २००३ | १९२,९९३.९५ |
| ३. | २००४ | ४२४,२२६.०० |
| ४. | २००५ | १,४१०,११४.५६ |
| ५. | २००६ | ९६५,४२७.५५ |
| ६. | २००७ | ३७६,८५६.३० |
| ७. | २००८ | ६३०,१३१.७५ |
| ८. | २००९ | ५१४,९१४.०० |
| ९. | २०१० | २२०,४१०.०० |
| १०. | २०११ | ४०२,५१८.०९ |
| ११. | २०१२ | ६१६,७६०.७५ |
| १२. | २०१३ | ७३४,१६८.४० |

[१५]

### ६. बेकरी विभाग -

बेकरी विभाग नव्याने माहे एप्रिल २००९ पासून सुरू करण्यात आला असून सदर विभागात फ्लोअर निडींग मशिन, ब्रेड स्लायसर मशिन, व केक निडर मशिन इत्यादी

मशिनरी कार्यरत आहेत. या विभागात सरासरी ४५ बंद्यांना काम देण्यात येते. या विभागामध्ये पावाचे उत्पादन होवून ते कारागृहातील आवश्यक बंदिजणांना पुरविले जात आहे. तसेच खारी, नान कटाई, क्रीम रोल, बनपाव इत्यादीचे उत्पादन केले जाते.[१६] या विभागाचे सन २००९ ते २०१३ पर्यंतचे वार्षिक उत्पादन पुढील प्रमाणे -

| **अ.क्र.** | **वर्ष** | **उत्पादन (रूपयात)** |
|---|---|---|
| १. | २००९ | १७३,०९५.०० |
| २. | २०१० | ७३०,५८१.५० |
| ३. | २०११ | ११,७१८,५४७.५० |
| ४. | २०१२ | ८४२,१७९.०० |
| ५. | २०१३ | १,०९०,७००.०० |

[१७]

### ७. जरीकाम विभाग -

या विभागात साड्यांवर, ड्रेसमटेरियल, ड्रेस वरती जरीकाम करून दिले जाते हा विभाग २०१० पासून सुरू करण्यात आला आहे. या विभागाचे २०१० ते २०१३ पर्यंतचे वार्षिक उत्पादन -

| **अ.क्र.** | **वर्ष** | **उत्पादन (रूपयात)** |
|---|---|---|
| १. | २०१० | २५,३१० |
| २. | २०११ | ९७,६१५ |
| ३. | २०१२ | ९२,३८८.७५ |
| ४. | २०१३ | ३२,९३०.०० |

[१८]

व्यावसायिक उपक्रमातील सर्व विभागांचे सन १९९० ते २०१३ पर्यंतचे एकत्रित उत्पादन पुढीलप्रमाणे -

| अ.क्र. | वर्ष | उत्पादन (रूपयात) |
|---|---|---|
| १. | १९९० | उत्पादनाचा तपशिल उपलब्ध नाही. |
| २. | १९९१ | उत्पादनाचा तपशिल उपलब्ध नाही. |
| ३. | १९९२ | १६,०२२.९५ |
| ४. | १९९३ | २५५,४४९.७५ |
| ५. | १९९४ | १,५७,७३५.३० |
| ६. | १९९५ | १४०,२३०.७० |
| ७. | १९९६ | ७०५,०३६.८५ |
| ८. | १९९७ | २८२,०८२.५० |
| ९. | १९९८ | २७५,२२५.०० |
| १०. | १९९९ | २७७,४५०.०० |
| ११. | २००० | ६४४,५०६.०० |
| १२. | २००१ | ६३६,८६६.५० |
| १३. | २००२ | ६,८९०,९८३.५९ |

| | | |
|---|---|---|
| १४. | २००३ | ४,३६१,५११.०० |
| १५. | २००४ | ३,३२०,९८६.७५ |
| १६. | २००५ | १३,३६०,५६६.४८ |
| १७. | २००६ | ८,३१२,३९१.५५ |
| १८. | २००७ | ६,५५६,९५१.५० |
| १९. | २००८ | ६,५८४,८९६.७५ |
| २०. | २००९ | ४,००५,७०१.०० |
| २१. | २०१० | ५,२७०,३९१.९२ |
| २२. | २०११ | १४,६७३,२५३.५४ |
| २३. | २०१२ | ६,६०१,६७१.६४ |
| २४. | २०१३ | ९,८५४,५९०.८० |

[१९]

या व्यावसायिक उपक्रमातील सर्व विभागांचे कामकाज कारखाना विभागामार्फत चालते. कारखाना विभागात काम करण्यासाठी लागणारी बंदिक्षमता दर्शवणारा तक्ता पुढीलप्रमाणे -

| अ.क्र. | कारखाना विभाग | बंदि संख्या क्षमता | | |
|---|---|---|---|---|
| | | कुशल | अर्धकुशल | अकुशल |
| १. | सुतारकाम | १० | १५ | १८ |
| २. | शिवणकाम | १६ | २० | २० |
| ३. | धोबीकाम | ३ | ४ | ५ |
| ४. | यंत्रमाग | २५ | २८ | ३२ |
| ५. | खड्डामाग | १० | १५ | १५ |
| ६. | लोहारकाम | १७ | १८ | १८ |
| ७. | बेकरी | १० | १५ | २० |
| | एकूण | ९१ | ११५ | १२८ |

२०

सध्या कारखाना विभागाकडे काम करणाऱ्या बंद्याची संख्या खालीलप्रमाणे -

| अ.क्रं. | कारखाना विभाग | सरासरी बंदि |
|---|---|---|
| १. | सुतारकाम | ९ |
| २. | शिवणकाम | ३० |
| ३. | धोबीकाम | ५ |
| ४. | यंत्रमाग | २४ |
| ५. | खड्डामाग | ३० |
| ६. | लोहारकाम | १३ |

| | | |
|---|---|---|
| ७. | बेकरी | ९ |
| ८. | एकूण | १२० |

२१

व्यावसायिक उपक्रमांच्या माध्यमातून बंदिजणांनी तयार केलेल्या विविध वस्तुंचे उत्पादन खरेदी करणाऱ्या विविध शासकीय, अशासकीय, सेवाभावी संस्था यांची माहिती पुढील प्रमाणे -

१) वसतीगृह, २) रूग्णालय, ३) कृषी विभाग, ४) पशुसंवर्धन, ५) तालुका भुमि अभिलेख, ६) जिल्हा परिषद, ७) शासकीय /निमशासकीय / संकीर्ण संस्था, ८) जिल्हा रूग्णालये, ९) न्यायालय, १०) अधिष्ठता / सर्वोपचार रूग्णालय (क्षय / कुष्ठरोग), ११) महानगरपालिका, १२) पोलिस विभाग, १३) लेखा विभाग, १४) औद्योगिक प्रशिक्षण संस्था

इत्यादी संस्थाचा यामध्ये समावेश होतो. या संस्था विभागनिहाय पुढीलप्रमाणे-

**१) वसतीगृह -**

१. गृहपाल, डॉ. बाबासोब आंबेडकर, मुलांचे शासकीय वसतीगृह, गारगोटी, कोल्हापूर., २. अधिक्षक, तेजस्विनी, महिला वसतीगृह, कोल्हापूर (गारगोटी रस्ता), ३. वसतीगृह प्रमुख, शासकीय आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय वसतीगृह, ई वॉर्ड, राजाराम रोड, टाकाळा, कोल्हापूर., ४. मा.अधीक्षक, शासकीय प्रतिभा महिला वसतीगृह, रत्नागिरी, जि. रत्नागिरी., ५. वसतीगृह प्रमुख, शासकीय आर्थिक दृष्ट्या मागासवर्गीय वसतीगृह, बुधगाव, सांगली., ६. सहाय्यक अधीक्षक, शासकीय राज्यगृह पुरूष, कोल्हापूर., ७. अधीक्षक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शासकीय मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह, इस्लामपूर, जि. सांगली, ८. गृहपाल, मुलांचे शासकीय वसतीगृह, कसबा-बावडा, कोल्हापूर., ९ अधीक्षक, शासकीय बालगृह व शाळा किल्ला, मिरज, जि. सांगली., १० अधीक्षक, शासकीय प्रौढ अपंगाचे प्रशिक्षण केंद्र व वसतीगृह, मिरज, सांगली. ११. गृहपाल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर

मागासवर्गीय, शासकीय मुलांचे वसतीगृह, आजरा, जि. कोल्हापूर., १२. गृहपाल, शासकीय मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह हातकणंगले, जि. कोल्हापूर., १३. अधीक्षक, शासकीय मागासवर्गीय मुलींचे वसतीगृह विश्रामबाग, सांगली., १४. वसतीगृह प्रमुख, शासकीय आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय वसतीगृह, कोल्हापूर,(शालिनी पॅलेस), १५. अधीक्षक, शासकीय अंधशाळा, कुडाळ, जि. सिंधुदुर्ग., १६. अधीक्षक, शासकीय मुलांचे वसतीगृह, चंदगड, जि.कोल्हापूर., १७. अधीक्षक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह, विश्रामबाग, सांगली., १८. अधीक्षक, मागासवर्गीय शासकीय मुलांचे वसतीगृह, विटा, ता.खानापुर, जि.सांगली., १९. अधीक्षक, मागासवर्गीय शासकीय मुलींचे वसतीगृह, विटा, ता. खानापुर, जि. सांगली., २०. शासकीय बी.सी. व इ.बी.सी. मुलींचे वसतीगृह, इस्लामपूर, जि.सांगली., २१. गृहपाल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुलांचे शासकीय वसतीगृह, कोल्हापूर., २२. गृहपाल, मुलांचे शासकीय वसतीगृह, रत्नागिरी., २३.अधीक्षक, शासकीय मुलांचे निरिक्षणगृह, बालगृह, सुलोचनानगर, सिंधुदुर्ग., २४.गृहपाल, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुलांचे शासकीय वसतीगृह, कसबा-बावडा, कोल्हापूर., २५. बी.सी. व इ.बी.सी. मुलींचे शासकीय वसतीगृह, जयसिंगपूर.[२२]

**२) रूग्णालय -**

१. वैद्यकीय अधीक्षक, वर्ग - १, उपजिल्हा रूग्णालय, गडहिंग्लज., २. प्रादेशिक मनोरूग्णालय, रत्नागिरी., ३. वैद्यकीय अधिक्षक, सेवा रूग्णालय, कसबा-बावडा, कोल्हापूर., ४. वैद्यकीय अधिकारी, वर्ग -१, रा. का. वि. यो. सेवा-दवाखाना, इचलकरंजी., ५. वैद्यकीय अधीक्षक, उपजिल्हा रूग्णालय, सावंतवाडी, जि.सिंधुदूर्ग., ६.वैद्यकीय अधिकारी, प्रभारी रा. का. वि. यो. सेवा-दवाखाना, मिरज, जि. सांगली., ७.छत्रपती प्रमिलाराजे रूग्णालय (CPR) कोल्हापूर., ८.वैद्यकीय अधीक्षक, वसाहत रूग्णालय, गांधी नगर, जि.कोल्हापूर., ९. वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रूग्णालय, खुपीरे, ता.करवीर, जि. कोल्हापूर., १०. वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रूग्णालय, ढेबेवाडी, ता.पाटण, जि. सातारा., ११. वैद्यकीय अधिकारी,

वर्ग-१, ग्रामीण रूग्णालय, मलकापूर, ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर., १२. वैद्यकीय अधीक्षक, उपजिल्हा रूग्णालय, कणकवली, जि. सिंधुदुर्ग., १३. वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय, भिवघाट (करंजे) ता.खानापुर, विटा, जि. सांगली., १४. वैद्यकीय अधीक्षक, वर्ग -१, ग्रामीण रूग्णालय, हातकणंगले, जि. कोल्हापूर., १५. वैद्यकीय अधीक्षक, वर्ग-१, ग्रामीण रूग्णालय, कागल, जि.कोल्हापूर., १६. वैद्यकीय अधिकारी, शशिकला क्षयरोग रुग्णालय, जयसिंगपूर, जि. कोल्हापूर., १७. वैद्यकीय अधीक्षक, वर्ग-१, ग्रामीण रुग्णालय, चंदगड, जि. कोल्हापूर., १८. उपसंचालक, आरोग्य सेवा कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर., १९. वैद्यकीय अधीक्षक, वर्ग-१, ग्रामीण रूग्णालय, गगणबावडा, जि. कोल्हापूर., २०. वैद्यकीय अधीक्षक, वर्ग-१, उपजिल्हा रूग्णालय, कोडोली, जि.कोल्हापूर., २१. वैद्यकीय अधिकारी, ग्रामीण रुग्णालय, मुरगूड., २२. कोल्हापूर कॅन्सर सेंन्टर, कोल्हापूर., २३. वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय, आष्टा, ता.वाळवा, जि. सांगली., २४. वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय, शिराळा, ता.शिराळा, जि. सांगली., २५. वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय, कुडाळ जि.सिंधुदूर्ग., २६. सेवा व्यवस्थापक विभागीय कार्यशाळा, आरोग्यसेवा (परिवहन) कोल्हापूर., २७. पद्मभूषण वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालय, सांगली., २८.सहाय्यक संचालक आरोग्य सेवा, हिवताप, कोल्हापूर. २९. सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा, कुष्ठरोग, शेंडापार्क, कोल्हापूर., ३०. मेडिकल ऑफिसर, शशिकला क्षयरोग आरोग्यधाम, जयसिंगपूर, जि.कोल्हापूर., ३१. जिल्हा क्षयरोग अधिकारी (CPR) रुग्णालय, कोल्हापूर., ३२. उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर (बावडा)., ३३. आरोग्य व कुंटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, कोल्हापूर., ३४. सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा, कुष्ठरोग, . कोल्हापूर., ३५.अधीक्षक, शेंडापार्क, कुष्ठधाम, कोल्हापूर., ३६. विमा वैद्यकीय अधिकारी, प्रभारी राज्य कामगार विमा योजना सेवा दवाखाना, नागाळापार्क, कोल्हापूर., ३७. औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय उद्योगभवन, विश्रामबाग, सांगली., ३८. जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा, कोल्हापूर (प्रमुख रसायनशास्त्र ), ३९. जिल्हा हिवताप अधिकारी, सिंधुदुर्ग., ४०. जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा सिंधुदूर्ग नगरी ओरोस, जि. सिंधुदूर्ग., ४१. आधार नर्सिंग होम,

कोल्हापूर., ४२. मुख्याधिकारी, इंदिरा गांधी मेमोरियल हॉस्पिटल, इचलकरंजी., ४३.अधीक्षक, शासकीय कुष्ठधाम, केडगाव, ता.करमाळा, जि.सोलापूर., ४४. मा.सहाय्यक, संचालक आरोग्य सेवा, कुष्ठरोग, सांगली.[२३]

### ३) कृषी विभाग -

१. जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी, कोल्हापूर (कृषी विभाग)., २. तालुका कृषी अधिकारी, आजरा (कृषी विभाग)., ३. विभागीय कृषी सहसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर., ४. तालुका कृषी अधिकारी, करवीर., ५. उपविभागीय कृषी अधिकारी, कोल्हापूर., ६. तालुका कृषी अधिकारी, गगन बावडा, ७. तालुका कृषी अधिकारी, शिरोळ, जि. कोल्हापूर, ८. तालुका कृषी अधिकारी, हातकणंगले., ९.प्रादेशिक कृषी विस्तार व्यवस्थापक प्रशिक्षण संस्था, कोल्हापूर., १०. तालुका कृषी अधिकारी, वाळवा, जि.सांगली ., ११. तालुका कृषी अधिकारी, कागल., १२. तालुका कृषी अधिकारी, गडहिंग्लज., १३.सहयोगी संशोधन संचालक शेंडापार्क, कोल्हापूर., १४. उपविभागीय कृषी अधिकारी, कृषी विभाग, गडहिंग्लज., १५. तालुका कृषी अधिकारी, कृषी विभाग, राधानगरी, जि. कोल्हापूर., १६. तालुका कृषी अधिकारी, कृषी विभाग, भूदरगड, गारगोटी, जि. कोल्हापूर., १७. तालुका कृषी अधिकारी, कृषी विभाग, शाहूवाडी, जि. कोल्हापूर., १८. उपविभागीय कृषी अधिकारी, कृषी विभाग, सातारा., १९. कृषी विद्यालय, शेती फार्म, सांगाव रोड, कागल. २०. तालुका कृषी अधिकारी, कृषी विभाग, हातकणंगले., २१. कृषी महाविद्यालय, कोल्हापूर., २२. तालुका कृषी अधिकारी, कृषी विभाग (पन्हाळा), २३. जिल्हा मृद सर्वेक्षण व मृदचाचणी अधिकारी, कोल्हापूर.[२४]

### ४) पशुसंवर्धन -

१. सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन तालुका लघु पशुवैद्यकीय सर्व चिकीत्सालय, तासगाव, जि. सांगली., २. पशुधन विकास अधिकारी, पशुवैद्यकीय दवाखाना, श्रेणी-१,

ऐतवेडे बुद्रूक, ता.वाळवा, जि. सांगली., ३. सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन, रोग अन्वेषण (वराह) मंगळवार पेठ, कोल्हापूर., ४. सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन, तालुका लघु पशुवैद्यकीय, सर्व चिकीत्सालय, इचलकरंजी., ५. आयुक्त, पशसंवर्धन, पशुवैद्यकीय सर्व चिकीत्सालय, मंगळवार पेठ, कोल्हापूर., ६. जिल्हा पशुसंवर्धन, उप आयुक्त कृष्णा खोरे, दुध संघासमोर, आंबेडकर रोड, मिरज., ७. प्रक्षेल व्यवस्थापक वळुमाता प्रक्षेल, जत, जि. सांगली., ८. सहाय्यक संचालक, पशुसंवर्धन सर्व चिकीत्सालय मिरज, जि.सांगली., ९.जिल्हा पशसंवर्धन उपायुक्त, मिरज, जि. सांगली., १० सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन तालुका पशुवैद्यकीय लघु सर्व चिकीत्सालय, जयसिंगपूर, जि. कोल्हापूर., ११. सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन तालुका लघु पशुवैद्यकीय सर्वचिकीत्सालय, कागल, कोल्हापूर., १२.सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन तालुका पशुर्वद्यकीय सर्व चिकीत्सालय, शाहूवाडी (बांबवडे) कोल्हापूर., १३. सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकीत्सालय, कोल्हापूर., १४. सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन तालुका लघु पशुवैद्यकीय सर्वचिकीत्सालय, गडहिंग्लज, कोल्हापूर., १५. सहाय्यक आयुक्त (पशसंवर्धन) तालुका लघु पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, पन्हाळा (कोडोली) कोल्हापूर., १६. पशुधन विकास अधिकारी, वाळवा, पंचायत समिती, ईस्लामपूर., १७. पशुधन विकास अधिकारी पंचायत समिती, शिराळा.[२५]

### ५) तालुका भुमि अभिलेख -

१. तालुका निरिक्षक भूमि अभिलेख, उपधिक्षक, भूमि अभिलेख, शिरोळ., २.उपाधिक्षक, भुमि अभिलेख, कागल, जि.कोल्हापूर., ३. नगर भूमापण अधिकारी, कोल्हापूर., ४. कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, कोल्हापूर., ५.उपअधिक्षक, भूमि अभिलेख, पन्हाळा, कोल्हापूर., ६. तालुका उपअधीक्षक भूमि अभिलेख, शाहूवाडी, कोल्हापूर, ७. तालुका निरिक्षक भुमि अभिलेख, पन्हाळा, कोल्हापूर., ८.जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, कोल्हापूर., ९. तालुका निरिक्षक भूमि अभिलेख, करवीर., १०. तालुका

निरिक्षक, भूमि अभिलेख, गगनबावडा, कोल्हापूर., ११.तालुका निरिक्षक/ उपअधीक्षक, भूमि अभिलेख, राधानगरी., १२. ता.निरिक्षक भूमि अभिलेख, हातकणंगले., १३. ता. निरिक्षक, भूमि अभिलेख, गडहिंग्लज., १४. ता. निरिक्षक, भूमि अभिलेख, करवीर., १५. तालुका निरिक्षक, भूमि अभिलेख, चंदगड., १६.तालुका निरिक्षक, भूमि अभिलेख, आजरा. १७.उपअधीक्षक, भूमि अभिलेख, गगनबावडा., १८. लेखाधिकारी, लेखा परिक्षण पथक, कोल्हापूर., १९. नगर-भूमापन अधिकारी, इचलकरंजी, कोल्हापूर., २०. उपअधीक्षक, भूमि अभिलेख, भुदरगड, जि. कोल्हापूर.[२६]

**६) जिल्हा परिषद -**

१. मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, बालकल्याण, जिल्हा परिषद, कोल्हापूर., २.मा. कार्यकारी अभियंता (बांधकाम) जिल्हा परिषद, कोल्हापूर., ३. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) जिल्हा परिषद, कोल्हापूर., ४. मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) जिल्हा परिषद, कोल्हापूर., ५. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर., ६. जिल्हा सांख्यिकी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर., ७.मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर., ८. जिल्हा सांख्यिकी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली.,९. आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूर., १०. मा. जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर., ११. जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद, कोल्हापूर., १२. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर. [२७]

**७) शासकीय/ निमशासकीय / संकीर्ण -**

१. विभाग नियंत्रक राज्य परिवहन महामंडळ, सांगली., २. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र, भवानी मंडप, कोल्हापूर., ३. विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, कोल्हापूर., ४. अभिलेख अधिकारी (गट.क) पुराभिलेख कार्यालय, कोल्हापूर., ५. जिल्हा सांख्यिकी अधिकारी, रघुकूल बिल्डींग, बी वार्ड, सुभाष रोड, कोल्हापूर.,

६.सहाय्यक अभिरक्षक, वस्तुसंग्रहालय, कोल्हापूर., ७. संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव व विभागीय जाती प्रमाणप्त्र पडताळणी समिती क्र.२ कोल्हापूर., ८.मा. विभाग नियंत्रक परिवहन महामंडळ, उस्मानाबाद., ९. जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर., १०.दुग्धशाळा, व्यवस्थापक, शासकीय दुध योजना, चिपळूण, जि. रत्नागिरी., ११.दुग्धशाळा, व्यवस्थापक, एम.आय.डी.सी., एरिया, शासकीय दुध योजना, रत्नागिरी., १२. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (लेखापरिक्षण) कोल्हापूर., १३.संकीर्ण संस्था. १४. प्रादेशिक परिवहन अधिकारी. कोल्हापूर, (आरटीओ)[२८]

**८) न्यायालय -**

१. जिल्हा व सत्र न्यायालय कोल्हापूर., २. मा. दिवाणी न्यायालय 'क'स्तर कागल, जि. कोल्हापूर., ३. जिल्हा न्यायालय, सांगली., ४. जिल्हा न्यायालय,सोलापूर., ५.औद्योगिक न्यायालय, कोल्हापूर., ६. मा. पिठासन अधिकारी शाळा न्यायाधिकारण, कोल्हापूर., ६.दिवाणी न्यायालय, राधानगरी, जि. कोल्हापूर., ७. मा. दिवाणी न्यायालय, क स्तर, कुरूंदवाड., ८. अधीक्षक, (वित्त) दिवाणी न्यायालय, क स्तर, कोल्हापूर., ९. मा. दिवाणी न्यायाधिश (वरिष्ठ स्तर) गडहिंग्लज, कोल्हापूर., १०. मा. प्रबंधक, कौटुबिक न्यायालय, कोल्हापूर., ११. जिल्हा व सत्र न्यायालय, ओरिस, सिंधुदूर्ग.[२९]

**९) महानगरपालिका / नगरपालिका -**

१. स्टोअर सुपरिन्टेडंट महानगरपालिका, कोल्हापूर., २. मा. आयुक्त कोल्हापूर महानगरपालिका कार्यालय, कोल्हापूर., ३. प्राथमिक शिक्षण मंडळ कोल्हापूर महानगर पालिका, कोल्हापूर., ४. मा. प्रशासन अधिकारी नगरपरिषद शिक्षण मंडळ, इचलकरंजी., ५.प्रधान सचिव, प. व. डी. महानगरपालिका, कोल्हापूर., ६. प्रशासन अधिकारी प्राथमिक शिक्षण मंडळ, महानगरपालिका, कोल्हापूर, ८. प्रशासन अधिकारी नगरपालिका प्राथमिक

शिक्षण मंडळ, जयसिंगपूर., ९. मा. सहाय्यक आयुक्त कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर., १०. आरोग्य अधिकारी, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर.[३०]

**१०) पोलिस विभाग -**

१. विशेष पोलिस महानिरिक्षक कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर., २. पोलिस अधीक्षक, सातारा., ३. प्रभारी अप्पर उपायुक्त राज्य गुप्त वार्ता विभाग, कोल्हापूर., ४. पोलिस अधीक्षक, सांगली, ५. पोलिस अधीक्षक, कोल्हापूर., ६. पोलिस अधीक्षक, सोलापूर., ७.समादेशक राज्य राखीव पोलिस गट क्र. ३ जालना., ८. पोलिस अधीक्षक, सिंधुदूर्ग., ९.विशेष पोलिस महानिरिक्षक, कोल्हापूर., १०. अप्पर पोलिस अधीक्षक गुन्हा अन्वेषण विभाग,.परिक्षेत्र कोल्हापूर., ११. विशेष पोलिस महानिरिक्षक कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर., १२. प्राचार्य पोलिस प्रशिक्षण केंद्र तुरची, ता. तासगांव, जि. सांगली.[३१]

**११) लेखा विभाग -**

१. लेखाधिकारी, लेखापरिक्षण पथक (शिक्षण), कोल्हापूर., २. लेखाधिकारी, लेखापरिक्षण पथक (शिक्षण), सांगली., ३. कोषागार अधिकारी, सातारा., ४.लेखाधिकारी, जिल्हा लेखापरिक्षण पथक (शिक्षण), कोल्हापूर., ५. मा. जिल्हा लेखा तपासणी पथक शिक्षण विभाग, कोल्हापूर., ६. उपमुख्य लेखा परिक्षक स्थानिक निधीलेखा कार्यालय, कोल्हापूर., ७.कोषागार अधिकारी, कोषागार कार्यालय, सांगली., ८. शिक्षणाधिकारी प्राथमिक जिल्हा परिषद, सातारा., ९. वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (प्राथमिक) सांगली., १०. वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, कोल्हापूर.,११. लेखाधिकारी लेखा परिक्षक पथक, कोल्हापूर., १२. सहाय्यक संचालक स्थानिक निधी लेखा परिक्षण, सांगली., १३ सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षण, कोल्हापूर.[३२]

## १२) औद्योगिक प्रशिक्षण संस्था / विद्यालय/ कॉलेज/ विद्यापीठ -

१. प्राचार्य औद्योगिक प्रशिक्षण संस्था, सांगली., २. प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर., ३. प्राचार्य औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कोल्हापूर., ४. शिक्षणाधिकारी वेतन व भविष्य निर्वाह निधी (माध्यमिक) कोल्हापूर., ५. मा. शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर., ६. प्राचार्य औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कडेगांव, जि. सांगली., ७.मुख्याध्यापक शिवाजी तंत्रविद्यालय, केंद्र तथा औद्योगिक प्रशिक्षण शाळा, कोल्हापूर. , ८. राजाराम कॉलेज, विद्यानगर, कोल्हापूर., ९. मुख्याध्यापक म.न.पा. सावित्रीबाई फूले विद्यालय, कोल्हापूर., १०. प्राचार्य जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, सांगली., ११.होलीक्रॉस कॉनवेंट स्कूल, कोल्हापूर., १२. मुख्याध्यापक, शासकीय तांत्रिक विद्यालय/ औद्योगिक शाळा, सातारा., १३. शासकीय तंत्रनिकेतन, कराड., १४. प्रा. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डायट), कोल्हापूर., १५. प्राचार्य इन्स्टिट्युट ऑफ फार्मसी, उजळाईवाडी, कोल्हापूर. १६.प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन, मिरज. १७.प्राचार्य औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पन्हाळा., १८. प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतण मालवण, कुंभारमाठ, जि. सिंधुदूर्ग. १९. सहायोगी प्राध्यापक आरोग्य शिक्षण पथक, तासगांव, जि.सांगली., २०. जवाहर नवोदय विद्यालय, कागल, जि.कोल्हापूर., २२. जवाहर नवोदय विद्यालय, रत्नागिरी., २३. प्राचार्य औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शिरोळ, कोल्हापूर., २४. प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, तासगाव, जि. सांगली., २५.शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर., २६. प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, राधानगरी, जि. कोल्हापूर., २७. मुख्याध्यापक, शासकीय तंत्र माध्यमिक शाळा केंद्र, राधानगरी, जि. कोल्हापूर.[33]

यावरून असे दिसून येते की कोल्हापूर, सांगली, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, सातारा, उस्मानाबाद, सोलापूर, जालना या जिल्ह्यातील विविध शासकीय, निमशासकीय, संकीर्ण, विविध सेवाभावी संस्था, शैक्षणिक संस्था या कळंबा कारागृहातील बंदिजणांनी व्यावसायिक

उपक्रमाच्या माध्यमातून तयार केलेल्या वस्तुंची मोठ्या प्रमाणात खरेदी करतात याच्या माध्यमातून एक प्रकारे बंदिजणांच्या कला कौशल्यांना प्रोत्साहन देण्याचे काम करत आहेत.

परंतु या विषयावरती संशोधन करीत असतांना अभ्यासाअंती काही त्रुटी जाणवल्या त्या म्हणजे हे व्यावसायिक उपक्रम सध्या कारागृहात राबविले जात आहेत. ते समाजाला काही प्रमाणात उपयुक्त ठरत आहेत व बदिजणांना व कैद्यांना प्रशिक्षण ही अतिशय स्वागतार्ह गोष्ट आहे परंतु कारागृहात जे व्यावसायिक प्रशिक्षण बंद्यांना व महिलांना शिवण काम हे प्रशिक्षण सध्या कालबाह्य होत असलेली आहेत. त्यामुळे या प्रशिक्षणामूळे शिक्षा संपल्यानंतर कैदी स्वतःच्या पायावर उभा राहील हा विश्वास देता येत नाही. बदलत्या जीवन शैलीने अशा पारंपारिक कौशल्याचा फारसा उपयोग होत नाही. फर्निचर, कम्प्युटर ट्रेनिगं, वाहन दुरूस्ती आदिसह महिलांसाठी पॅकींग किंवा ड्रेस मटेरियल तयार करणे असे व्यावसायिक प्रशिक्षण देण्याची गरज आहे.

शिवाय कैद्यांना आयटीआयच्या माध्यमातून नव्या ट्रेडचे प्रशिक्षण देण्याची सुविधा उपलब्ध करून दिली तरी त्यांना कुठेही नोकरी मिळू शकते. कारण सध्या औद्योगिक वसाहती मध्ये ही कुशल कामगारांचा मोठा तुटवडा आहे. आयटीआय सर्टीफिकेट मिळालेल्या अशा प्रशिक्षित कैद्यांचे आयुष्य त्यामुळे सावरण्यास मदत होईल. शिक्षा संपल्यानंतर बाहेरच्या जगात कैद्यांना तत्काळ नोकरीची संधी मिळाली तर त्यांच्यात आपोआप आत्मविश्वास निर्माण हाईल. जगण्याची नवी आशा त्यांना अधिक चांगला माणूस बनवेल. कैद्यांच्या श्रमशक्तीचा उपयोग कारागृहात असतांना आणि शिक्षा संपल्यानंतरही समाजाला झाला तर अनेक चांगल्या गोष्टी घडू शकतील. यातुन कारागृहाचे उत्पन्न वाढण्याबरोबरच कैद्यांनाही सक्षम करता येईल.

### कारागृहाचे वस्तू विक्री केंद्र -

१६/०६/२०१० या रोजी कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह कळंबा येथे कैद्यांनी तयार केलेल्या वस्तुंच्या विक्री केंद्राचे उद्‌घाटन पश्चिम विभागाचे कारागृह उपमहानिरिक्षक सु. ना. चव्हाण यांच्या हस्ते झाले होते.[३४]

शासनाच्या कारागृहातील कैदी सुधारणा व पुनर्वसन धोरणांतर्गत कारागृहात सुरू असलेल्या सुतारकाम, लोहारकाम, शिवणकाम, वस्त्रोद्योग, विणकाम, बेकरी विभागामार्फत विविध वस्तुंचे उत्पादन कैद्यांमार्फत करून घेतले जाते. या वस्तू शासनमान्य दरात ग्राहकांपर्यत पोचवण्यासाठी हे विक्री केंद्र सुरू केले होते.[३५] या विक्रीची वेळ सकाळी ९ ते १ व दुपारी ३.३० ते ५.०० पर्यंत चालू असते.[३६]

या विक्री केंद्रामार्फत पुढील वस्तुंचा पुरवठा केला जातो.

**वस्तुचे नाव**

१. टॉवेल (ब्लिच ५ x ३)

२. टॉवेल साधे ४½ x २½

३. चौकडा ब्लिच बेडशिट (९०x५४)

४. डायमंड चादर (९०x४८)

५. बेडशिट प्रिंटेड ७½ x ७½ ( पिलो कव्हरसह)

६. खाकी गणवेश कापड ५४

७. मच्छरदाणी ६x४

८. सतरंजी चौ. फू. प्रमाणे

९. सफेद टेरी शर्टींग कापड ५४ (प्रतिमिटर)[३७]

या शिवाय बांगडी स्टॅण्ड, लाकडी सजावटीच्या वस्तु, ग्रंथ स्टण्ड, लेडीज टॉप, बस्कर पट्टी इ. वस्तुही आहेत.[३८]

**कारागृहातील शेती व्यवसाय -**

कळंबा मध्यवर्ती कारागृहात या व्यावसायिक उपक्रमांशिवाय मुख्य उद्योग शेती आहे. कारागृहाची कारागृह परिसर, रेसकोर्स नाका, या ठिकाणी सुमारे ७० एकर शेती आहे. कात्यायणी परिसरात ही कारागृहाची शेती आहे.[३९] कारागृहाच्या मालकीची एकूण १८.६२ हेक्टर शेती असून त्यात भात, संकरीत ज्वारी, गहू व भाजीपाला घेतला जातो.[४०]

शेतीच्या मशागती पासून विविध पिकांचे उत्पादन घेण्यापर्यंतची सर्व कामे कारागृहात शिक्षा भोगत असलेल्या, कैद्यांकडून करून घेतली जातात. शेतीसाठी जागोजागी बोअर खुदाई केल्यामुळे मुबलक पाण्याची सोय या ठिकाणी आहे. येथे गहू , भात, भाजीपाला, फळभाज्या व ऊस या उत्पादनापैकी फळभाज्या व गहू, भाताचा कैद्यांच्या भोजनासाठी वापर करून अन्य पिकांचे विक्रीद्वारे उत्पन्न तिमळते.[४१] शेतीचे काम हे एका वर्षापेक्षा कमी शिक्षा असणाऱ्या कैद्यांना दिले जाते.[४२]

कारागृहात मुंबई, ठाणे, कल्याण, सातारा, सांगली, सोलापूर, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, आदी ठिकाणचे १८०० कैदी शिक्षा भोगत आहेत. यामध्ये ५० महिला कैद्यांचा समावेश आहे. या कैद्यांना रोज चहा- नाष्टा, दोन वेळचे जेवण, कारागृहातर्फे दिले जाते. त्यामुळे शेतीतून मिळणाऱ्या उत्पादगाचा कारागृहाला मोठ्या प्रमाणात फायदा होतो. "तत्कालीन अप्पर जिल्हा पोलिस अधीक्षक मीरा बोरवणकर यांनी कळंबा मध्यवर्ती कारागृहाला भेट देऊन पाहणी केली होती. कारागृहाचा परिसर आणि कैद्यांच्या श्रमातून बहरलेली शेती पाहून त्यांनी बौध्दीक व शारीरिकदृष्ट्या सक्षम असलेल्या कैद्यांसाठी खुले कारागृह सुरू करण्यासाठी शासनाला प्रस्ताव पाठविला होता. सध्या राज्यात पैठण, औरंगाबाद, मोरशी

(अमरावती) आणि पूणे या ठिकाणी खुले कारागृह सुरू करण्यात आली आहेत. या धर्तीवरच कोल्हापूरात खुले कारागृह सुरू करावे यासाठी त्यांनी पाठपुरावा केला होता."[४३]

या कारागृहात २०१२-२०१३ मध्ये पहिल्यांदाच ऊसाची शेती करण्यात आली होती. त्यातून २२ टन ऊसाचे उत्पन्न मिळाले होते. हा ऊस 'कागलच्या शाहू सहकारी साखर कारखान्याकडे गाळपासाठी देण्यात आला होता.' २०१३ या वर्षी फळभाज्या, गहू, भाताचा कैद्यांच्या भोजनासाठी वापर करून अन्य पिकांच्या विक्रीद्वारे १२,०३,३०८.०० रूपयांचे उत्पादन मिळाले होते. त्यापैकी पाच लाख रूपयांचा खर्च झाला होता व उर्वरीत साडेसात लाख रूपयांचा महसूल हा 'राज्य सरकारला' मिळाला होता.

कैद्यांना या कामाचा मोबदला म्हणून दररोज ४० रूपये दिले जातात. शिक्षा संपल्यानंतर त्यांना एकरकमी पैसे दिले जातात. कैद्यांनी फुलवलेली शेती पाहिली तर त्यांच्या कष्टाळू पणाची प्रचिती येते. तणविरहीत व हिरवीगार शेती कळंबा मध्यवर्ती कारागृहातील बंदिजणांनी पिकवली आहे.[४४]

**कारागृहाच्या जमीन क्षेत्राची माहिती -**

१) एकूण कारागृहाचे क्षेत्र ५१.३५.६२ हेक्टर आहे.

कारागृहाचे क्षेत्र - ११.२३.२४ हेक्टर आहे.

इमारती व रस्ते यांचे क्षेत्र - ०७.६७.२८ हेक्टर आहे.

**१. बंधारा बगीचा शेती क्षेत्र -**

१) बागायत - ४.०० हेक्टर

२) जिरायत - ५.०० हेक्टर

३) वृक्ष लागवड - ०.६० हेक्टर

४) पडीक / दलदल - १.४० हेक्टर

बंधारा ७/१२ प्रमाणे सर्वे नं ८२१-२९.९०.६२ हेक्टर

**२. पदमाळा शेती बगीचा क्षेत्र -**

१) बागायत - २.२० हेक्टर

२) जिरायत - १३.०० हेक्टर

३) वृक्ष लागवड - ०.३० हेक्टर

४) पडीक / दलदल - ५.९५ हेक्टर

पदमाळा ७/१२ प्रमाणे सर्वे नं ६८४ - २१.४५ हेक्टर.[४५]

**३. जमीनीचे एकूण क्षेत्र - १२६ एकर ३६ गुंठे, ७/१२ उतारा**

१) सर्व्हे नं. ६८४ पदमाळा

२) सर्व्हे नं. ८२१ बंधारा

१. बागायत - १६ एकर

२. जिराईत - २० एकर

३. वनराई - ७ एकर

४. पोट खराब - ५ एकर

५. पड व दलदलीचे क्षेत्र - १० एकर २६ आर

६. कारागृह इमारती क्षेत्र - १५ एकर १० आर

सर्व्हे क्रं. ८२१ एकूण क्षेत्र - ७३ एकर ३६ आर

१. ७३ एकर ३६ आर बंधारा कारागृह परिसर

२. ५३ एकर ६२ आर पदमाळा बगीचा परिसर [४६]



BARR. BALA... ...VERSITY, ...

**शेतीमध्ये घेतली जाणारी पिके -**

१. पिकांचे प्रकार पुढील प्रमाणे -

१) कडधान्य

२) अन्न धान्य

३) गळीत धान्य

४) फळभाजी

५) पालेभाजी

**पिकांची सविस्तर माहिती पुढील प्रमाणे -**

१. कडधान्य - मोहरी

२. अन्न धान्य - तांदुळ, गहू

३. गळीत धान्य - ऊस

४. फळभाजी - मुळा, कोबी, कांदा, वांगी, भेंडी, दोडका, टोमॅटो, हिरवी मिरची, दुधी भोपळा, डांगर भोपळा, नवलकोला, कारले, फ्लॉवर, श्रावण घेवडा इत्यादी.

५. पालेभाजी - तांदळी, करडई, पालक, राजगीरा, कोथबींर पोकळा इत्यादी[४७]

**कारागृहातील शेती उत्पादनाचा तपशिल -**

या कारागृहात शेती व्यवसाय पूर्वी पासून केला जातो. परंतु निश्चित कोणत्या वर्षी या कारागृहात शेती व्यवसाय सुरू झाला याची माहिती उपलब्ध नाही. या कारागृहातील शेती उत्पादनाचा तपशिल सन १९९६ पासून उपलब्ध आहे.

सन १९९६ ते डिसें २०१३ अखेर शेती उत्पादन माहिती खालीलप्रमाणे -

| अ. क्रं. | सन | एकूण उत्पादन (रूपयात) |
|---|---|---|
| १. | १९९६-९७ | ५,२६,०१८.०० |
| २. | १९९७-९८ | ४,४३,९७३.०० |
| ३. | १९९८-९९ | ५,०२,३९७.०० |
| ४. | १९९-२००० | ७,९८,२९८.०० |
| ५. | २०००-०१ | १०,६३,५७९.०० |
| ६. | २००१-०२ | ८,०१,७३०.०० |
| ७. | २००२-०३ | ९,१४,३७१.०० |
| ८. | २००३-०४ | ११,७८,०७०.०० |
| ९. | २००४-०५ | ९,६२,३०५.०० |
| १०. | २००५-०६ | १२,४९,०००.०० |
| ११. | २००६-०७ | १०,४८,०२९.०० |
| १२. | २००७-०८ | १०,१२,७७३.०० |
| १३. | २००८-०९ | ९,६५,९९०.०० |
| १४. | २००९-१० | ७,९६,१४१.०० |
| १५. | २०१०-११ | ४,९३,९८३.०० |
| १६. | २०११-१२ | ८,१९,६३१.०० |
| १७. | २०१२-१३ | १२,०३,३०८.०० |

| | | |
|---|---|---|
| १८. | माहे मार्च २०१३ ते डिसें २०१३ | ९,१४,१२८.०० |
| | एकूण | १,४२,११,३३६.०० |

[४८]

शेतीचे सर्वात कमी उत्पादन १९९७-९८ या वर्षी ४,४३,९७३.०० रूपये आहे व सर्वात जास्त उत्पादन २००५-२००६ या वर्षी १२,४९,०००.०० रूपये आहे. १९९७-९८ या वर्षी उत्पादन कमी असल्याची कारणे.

१. अवेळी पाऊस

२. किड व रोगाचा प्रार्दुभाव जास्त प्रमाणात

३. खताची उपलब्धता योग्य वेळी नसल्याने

४. बंदी मजूरांची कमतरता

५. सदर कालावधीत विद्युत मोटर नादुरूस्त असल्याने

६. टॅक्टर नसल्याने

७. व त्याअंतर्गत ट्रॅक्टर औजारे नादुरूस्त असल्याने

इत्यादी कारणाने उत्पादन वाढवता आले नाही. २००५-०६ या वर्षी सर्वात जास्त उत्पादन असल्याची कारणे.

१. लागवडीस योग्य वातावरण

२. रोग किडीत कमी प्रार्दूभाव

३. खतांचा लागवडीस वेळेवर पुरवठा

४. बंदी मजूर आवश्यकतेनुसार उपलब्ध [४९]

**समारोप -**

कारागृहांचे मुख्य उद्दिष्ट हे 'सुधारणा व पुनर्वसन आहे. त्यामुळे कळंबा मध्यवर्ती कारागृहाचा इतिहास पाहतांना बंदिजणांच्या सुधारणा व पुनर्वसनासाठी राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती पाहणे अत्यावश्यक आहे. मागील प्रकरणात बंदिजणांच्या सुधारणा व पुनर्वसनासाठी राबविले जाणारे शैक्षणिक व सामाजिक उपक्रम पाहिले होते. या प्रकरणात बंदिजणांच्या सुधारणा व पुनर्वसनासाठी राबविले जाणाऱ्या व्यावसायिक उपक्रमांची माहिती घेतली आहे. कारण शैक्षणिक, सामाजिक उपक्रमांचा बंदिजणांच्या व सुधारण व परिवर्तन करण्यासाठी जसा उपयोग होतो. त्याप्रमाणेच कारागृहातून बाहेर पडल्यानंतर बंदिजणांना स्वतःच्या पायावर सक्षमपणे उभे करण्यासाठी या व्यावसायिक उपक्रमांची मदत होते. कारागृहात राबविले जाणारे व्यावसायिक उपक्रम पाहिले तर बंदिजणांच्या पुनर्वसनासाठी जे उपक्रम राबविणे आवश्यक आहे ते उपक्रम काही प्रमाणात या कळंबा मध्यवर्ती कारागृहात पूर्वीपासून राबविलेजात आहेत याची प्रचिती येते. या उपक्रमांच्या माध्यमातून तयार होणाऱ्या वस्तुंची खरेदी विविध शासकीय, अशासकीय, संकीर्ण, सेवाभावी संस्था व समाजातील नागरीक मोठ्या प्रमाणात खरेदी करतात. याची प्रचिती या व्यावसायिक उपक्रमांतील विविध वस्तुंचे उत्पादन पाहिल्यावर येते. तसेच हे उपक्रम कालबाह्य होत असल्याने बदलत्या जीवनशैलीने अशा पारंपारिक कौशल्याचा काही प्रमाणातच उपयोग होतो. त्यामुळे आधुनिक व्यावसायिक प्रशिक्षण देण्याची गरज आहे हे लक्षात येते.

तसेच ज्याप्रमाणे आपल्या देशाचा मुख्य व्यवसाय शेती आहे त्याप्रमाणे या कारागृहातील मुख्य उद्योग शेती आहे. या शेतीत घेतली जाणारी पिके, उत्पादनाचा तपशिल, व बंदिजणांनी पिकवलेली शेती पाहिली तर या बंधिबांधवांच्या कष्टाळूपणाची प्रचिती यामधुन मिळते. कारागृह हे खऱ्या अर्थाने बंदिजणांच्यात सुधारणा व पुनर्वसन करणारे केंद्र आहे. गरज आहे ती समाजाने परत या बंदिबांधवांना माणूस म्हणून स्विकारण्याची.

## संदर्भ सुची


१. दैनिक पुढारी पुरवणी, दि.०८/१०/२०१२, पृ. ३

२. कळंबा मध्यवर्ती कारागृहातील कारखाना विभागाला प्रत्यक्ष भेट देवून माहिती दि.०४/१२/२०१३ वेळ दुपारी १२.३०.

३. कळंबा मध्यवर्ती कारागृहाची माहिती पुस्तिका, पृ. १६

४. कळंबा मध्यवर्ती कारागृहातील कारखाना विभागाला प्रत्यक्ष भेट देवून माहिती दि.०५/१२/२०१३, वेळ १०.४५.

५. उपरोक्त, कळंबा मध्यवर्ती कारागृहाची माहिती पुस्तिका पृ. १६

६. कित्ता, पृ. १६

७. कळंबा कारागृहातील सुतारकाम विभागाचे सन २००२ ते २०९३ पर्यंतचे मासिक ताळेबंद.

८. उपरोक्त, कळंबा मध्यवर्ती कारागृहाची माहिती पुस्तिका, पृ. १६

९. कळंबा कारागृहातील शिवणकाम विभागाचे सन २००२ ते २०९३ पर्यंतचे मासिक ताळेबंद.

१०. उपरोक्त, कळंबा मध्यवर्ती कारागृहाची माहिती पुस्तिका, पृ. १६

११. कळंबा कारागृहातील धोबीकाम विभागाचे सन २००२ ते २०१३ पर्यंतचे मासिक ताळेबंद.

१२. उपरोक्त, कळंबा मध्यवती कारागृहाची माहिती पुस्तिका पृ. १६

१३. कळंबा कारागृहातील यंत्रमाग विभागाचे सन २००२ ते २०१३ पर्यंतचे मासिक ताळेबंद.

१४. उपरोक्त, कळंबा मध्यवर्ती कारागृहाची माहिती पुस्तिका, पृ. १७

१५. कळंबा कारागृहातील लोहारकाम विभागाचे सन २००२ ते २०१३ पर्यंतचे मासिक ताळेबंद.

१६. उपरोक्त, कळंबा मध्यवर्ती कारागृहाची माहिती पुस्तिका, पृ. १७

१७. कळंबा कारागृहातील बेकरी विभागाचे सन २००९ ते २०१३ पर्यंतचे मासिक ताळेबंद.

१८. कळंबा कारागृहातील जरीकाम विभागाचे सन २०१० ते २०१३ पर्यंतचे मासिक ताळेबंद.

१९. कारखाना विभागातील सर्व विभागांचे मासिक व वार्षिक ताळेबंद सन १९९२ ते २०१३.

२०. उपरोक्त, कळंबा मध्यवर्ती कारागृहाची माहिती पुस्तिका , पृ. १७

२१. कित्ता पृ. १७

२२. वसतीगृह विभागांना कारागृह निर्मित वस्तु पुरवठा करणेबाबत फाईल.

२३. रूग्णालय विभागांना कारागृह निर्मित वस्तु पुरवठा करणेबाबत फाईल.

२४. कृषी विभागांना कारागृह निर्मित वस्त पुरवठा करणेबाबत फाईल.

२५. पशुसंवर्धन विभागांना कारागृह निर्मित वस्तु पुरवठा करणेबाबत फाईल.

२६. तालुका भुमि अभिलेख विभागांना कारागृह निर्मित वस्तु पुरवठा करणेबाबत फाईल.

२७. जिल्हा परिषदांना कारागृह निर्मित वस्तु पुरवठा करणेबाबत फाईल.

२८. शासकीय / निमशासकीय/ संकीर्ण संस्थांना कारागृह निर्मित वस्तु पुरवठा करणेबाबत फाईल.

२९. न्यायालय विभागांना कारागृह निर्मित वस्तु पुरवठा करणेबाबत फाईल.

३०. महानगरपालिका / नगरपालिका विभागांना कारागृह निर्मित वस्तु पुरवठा करणेबाबत फाईल.

३१. पोलिस विभागांना कारागृह निर्मित वस्तु पुरवठा करणेबाबत फाईल.

३२. लेखा विभागांना कारागृह निर्मित वस्तु पुरवठा करणेबाबत फाईल.

३३. औद्योगिक प्रशिक्षण संस्था/ विद्यालय/ कॉलेज/ विद्यापीठ विभागांना कारागृह निर्मित वस्तु पुरवठा करणेबाबत फाईल.

३४. सकाळ पुरवणी, दि.१७/०६/२०१०, पृ. ५

३५. पुढारी पुरवणी, दि.१८/०६/२०१०, पृ. ४

३६. कळंबा मध्यवर्ती कारागृहाच्या वस्तु विक्री केंद्रावरील वेळ.

३७. कळंबा मध्यवर्ती कारागृहाच्या वस्तु विक्री केंद्राचा फलक.

३८. प्रत्यक्ष विक्री केंद्रास भेट, दि.०६/०१/२०१४, वेळ ११.३०.

३९. लोकमत, दि.०६/०५/२०१३, पृ. २

४०. महाराष्ट्र टाईम्स, दि.१०/०४/२०१३, पृ. २

४१. चौधरी कि.का., कोल्हापूर जिल्हा गॅझेटियर, प्रकाशक महाराष्ट्र शासन, १९८९, पृ. ५५८.

४२. उपरोक्त, महाराष्ट्र टाईम्स, पृ. २

४३. कित्ता, पृ. २

४४. उपरोक्त, लोकमत, पृ. २

४५. कळंबा मध्यवर्ती कारागृहाची माहिती पुस्तिका, पृ. २१

४६. कळंबा मध्यवर्ती कारागृहाच्या शेती विभागातील शेत जमिनीचे ७/१२ व ८ अ चे उतारे फाईल क्र. ३७.

४७. कळंबा मध्यवर्ती कारागृहाच्या शेती विभागातील बगीचा उत्पादन नोंदवही क्र.८.

४८. कळंबा मध्यवर्ती कारागृहातील शेती विभागाचे सन १९९६ ते २०१३ पर्यंतचे वार्षिक ताळेबंद.

४९. कृषी साहाय्यक, कृषी पर्यवेक्षक, तुरुंगाधिकारी यांच्या मार्फत २२/०६/२०११ रोजी मा. अधीक्षक कोल्हापूर म.का. कळंबा यांना कारागृहातील सर्व कामकाजाचा एकत्रित आढावाबाबत सादर केलेली प्रत.